# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्‍यालय,अवसरी (खुर्द)

## ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५

# फर्निचर खरेदी करिता निविदा दस्तावेज

## २०२४-२५

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द

तालुका-आंबेगावजिल्हापुणे ४१२४०५

दूरध्वनी क्र. : ०२१३३ २३०५८२संकेतस्थळ: www.gcoeara.ac.in

ईमेल:office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in


जावक क्र. शाअवसंमाअ/फर्निचरखरेदी/२०२४/ 4235 दिनांक:१६/१२/२०२४

16 DEC 2024

## ई-निविदा सूचना

या महाविद्यालयातील विविध विभागातील प्रयोगशाळा व वर्गखोल्या यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध फर्निचर व तत्सम इतर साहित्य ई-निविदा मागवून बाह्यस्त्रोताकडून खरेदी करून घ्यावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पद्धतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेच्या अटी व शर्ती बाबतच्या सूचना निविदेत दिलेल्या आहेत. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ३०-१२-२०२४ असा आहे. निविदा प्रपत्र, निविदेत जोडावयाची कागदपत्रे, निविदाकाराणे पाळावयाच्या अटी व शर्ती यांचा तपशील महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.goceara.ac.in व महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. निविदाकारांना निविदा सादर करण्यासंबंधी काही शंका असल्यास त्याचे निराकरण निविदापुर्व बैठकीत करण्यात येईल.

ई-निविदा संबंधीची महत्वाची माहिती

| अ. क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | ई-निविदा नोटीस प्रसिद्धी | महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in यावर उपलब्ध आहे. |
| २ | कामाचे स्वरूप | शा. अ. व सं. मा. अवसरी (खुर्द) येथील विविध विभागातील प्रयोगशाळा व वर्गखोल्या यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध फर्निचर व तत्सम इतर साहित्य ई-निविदा मागवून बाह्यस्त्रोताकडून खरेदी करणे. |
| ३ | ई-निविदा शुल्क | रुपये १९,०००/- ऑनलाईन पद्धतीने संकेत स्थळावर भरण्यात यावे. |
| ४ | बयाना रक्कम | रुपये १,९०,०००/- (परतावा योग्य) |
| ५ | संपर्कासाठी पत्ता | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द), तालुका-आंबेगाव , जिल्हा- पुणे-४१२४०५ |
| ६ | दूरध्वनी क्रमांक | ०२१३३ - २३०५८० |
| ७ | ई-मेल आय. डी. | principal@gcoeara.ac.in |

Govt. College of Engineering and Research, Avasari, Tal. Ambegaon, Dist. Pune

| | | |
|---|---|---|
| ८ | ई-निविदा संकेतस्थळ | https://www.mahatenders.gov.in |
| ९ | ई-निविदा वैधता | १२० दिवसांकरिता |
| १० | ई-निविदा पूर्व बैठकस्थळ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द), प्रशासकीय इमारतीतील सभागृह |

16-12-24

**(डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे)**

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

**Principal**
**Government College of Engineering**
**Avasari Khurd,Dist.Pune**

Govt. College of Engineering and Research
Awasari, Tal.Ambegaon, Dist.Pune

## महत्वाच्या तारखा

ई-निविदा भरण्यासंदर्भात महत्वाच्या तारखा खालील तक्त्यात देण्यात येत आहेत. निविदाकाराने सदर तारखांचे तंतोतंत पालन करावे.

| अ.क्र. | कार्य विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करणे | दि. १६.१२.२०२४ (दुपारी ४. ३० वाजता ) |
| २ | संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध करणे | दि. १६.१२.२०२४ (दुपारी ४. ३० वाजता ) |
| ३ | ई-निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक | दि. १६.१२.२०२४ (दुपारी ४.३० वाजता ) |
| ४ | ई-निविदा पूर्व बैठक दिनांक (इच्छुक निविदाकारांकारिता) | दि. २०.१२.२०२४ (दुपारी ११.०० वाजता ) |
| ५ | निविदा पूर्व बैठक स्थळ | महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृह |
| ६ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.३०.१२.२०२४ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत ) |
| ७ | तांत्रिक निविदा छाननी दिनांक | दि.०१.०१.२०२५ (सकाळी ११.०० वाजता ) |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | दि.०३.०१.२०२५ (सकाळी ११.०० वाजता) |

**सर्व पात्र निविदाकारांनी तांत्रिक व वाणिज्यिक निविदा ऑनलाईन पद्धतीने** www.mahatenders.gov.in **या संकेतस्थळावर सादर करावी. अन्य कोणत्याही पद्धतीने या कार्यालयास सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदाकाराने निविदेसोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडावी. आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसल्यास निविदा रद्द समजण्यात येईल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.**

16-12-24

**डॉ. दिलीप रा. पानगव्हाणे**

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द).

**Principal**
**Government College of Engineering**
**Avasari Khurd,Dist.Pune**

Govt. College of Engineering and Research
Avasari, Tal.Ambegaon, Dist.Pune

**निविदा पत्रक**

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

## फर्निचर खरेदी ई निविदेच्या अटी व शर्ती

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील विविध विभागातील प्रयोगशाळा व वर्गखोल्या यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध फर्निचर व तत्सम इतर साहित्य ई-निविदा मागवून बाहयस्त्रोताकडून **प्रपत्र अ** मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी करून घ्यावयाचे आहे. त्याबाबतच्या अटी, शर्ती व प्रपत्र खालील शीर्षकानुसार आहेत.

१. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

२. निविदा सादर करावयाची पद्धती

३. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

४. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

### <u>१. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष</u>

१.१ निविदाकार GST नोंदणीकृत असावा. तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१.२ निविदाकाराची मागील तीन वर्षाची किमान रु. १.०० कोटी इतकी उलाढाल असावी. त्यापृष्ट्यर्थ लेखा परीक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेले पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

१.३ निविदाकाराकडे मागील तीन वर्षात कोणत्याही शासकीय अस्थापना येथे किमान रु. १.०० कोटी इतक्या रकमेच्या फर्निचर किंवा इतर साहित्य व उपकरणे याचा निविदा प्रक्रियेनुसार पुरवठा केलेला असला पाहिजे. त्यापृष्ट्यर्थ तसे समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा आस्थापना प्रमाणपत्र ई.) जोडणे आवश्यक आहे.

१.४ Shop Act प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. Shop Act प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१.५ निविदेतील उल्लेखित Modular Furniture चा पुरवठा करणेसाठी प्रथम स्थळ पाहणी करून त्याबाबतचा सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचा अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तसा अहवाल जोडणे आवश्यक आहे.

### २.निविदा सादर करावयाची पद्धती

२.१ प्रत्येक निविदाकारास एकच निविदा भरता येईल.

२.२ निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर ई-निविदा पूर्व बैठक ( Pre bid meeting ) आयोजित करण्यात येईल. त्यास निविदाकाराने किवा अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहून शंका निरसन करून घ्यावे.

Govt. College of Engineering and Research, Avasari, Tal. Ambegaon, Dist. Pune
सत्यमेव जयते

२.३ **तांत्रिक निविदा** - तांत्रिक निविदा ऑनलाईन पद्धतीने सादर करताना (संकेतस्थळावर अपलोड करताना) खालील कागदपत्रांचा समावेश असावा.

१) संस्थेच्या लेटरहेडवर सोबत दिलेले विवरणपत्र **(प्रपत्र - ब )**

२) वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र

३) संस्थेच्या संचालकाचे अथवा स्वतःचे नाव, कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल यांचे विवरण

४) नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे PAN कार्ड

५) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी भरणा केल्याचे GSTR-1 व GSTR-3B

६) आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत

७) निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षांची एकूण म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ ची एकूण उलाढाल कमीतकमी **रूपये ०१ कोटी** असल्याचे संबंधीत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे आणि तसेच चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) प्रत.

८) निविदाकाराकडे मागील तीन वर्षात कोणत्याही शासकीय अस्थापना येथे किमान एकूण रु. १.०० कोटी इतक्या रकमेच्या फर्निचर किंवा इतर साहित्य व उपकरणे याचा निविदा प्रक्रियेनुसार पुरवठा केलेला असला पाहिचे. त्यापृष्ट्यर्थ तसे समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा आस्थापना प्रमाणपत्र ई.) जोडणे आवश्यक आहे.

९) निविदा शुल्क रु. १९,०००/- ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची पावती

१०) बयाना रक्कम रु. १,९०,०००/-ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची पावती

११) निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्वसाक्षांकित हमीपत्र

वरील सर्व कागदपत्रे स्कॅन करून त्याचीएकच pdf file करून https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी.

२.४ **वाणिज्यिक निविदा**– सोबत जोडलेल्या **प्रपत्र-क** (BoQ नमुना) नुसार वाणिज्यिक निविदेत निविदाकाराचे नाव व दर (सर्व प्रकारच्या करासहित) सुस्पष्टपणे रुपयात वेगवेगळे नमूद करणे आवश्यक राहील.

Govt. College of Engineering and Research, Awasari, Tal. Ambegaon, Dist. Pune

## ३. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

३.१ नमूद करण्यात आलेल्या तारखेस सदर संकेतस्थळावर सादर झालेल्या निविदा उघडण्यात येतील व समितीद्वारे त्याचं तांत्रिक छाननी करण्यात येईल.

३.२ तांत्रिक छाननी दरम्यान निविदाकाराने स्कॅन करून अपलोड केलेली सर्व प्रमाणपत्रे व वैधता तपासण्यात येईल.

३.३ पात्र निविदाकारांची यादी संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल .

३.४ तांत्रिक छाननीअंती पात्र असलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील.

## ४. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

४.१ वाणिज्यिक निविदेत सोबत जोडलेल्या **प्रपत्र-क** (BoQ नमुना) नुसार वाणिज्यिक निविदेत निविदाकाराने नमुद केलेले दरांप्रमाणे सर्व साहित्यांच्या दरांची एकूण बेरीज (सर्व प्रकारच्या करासहित) जो निविदाकार सर्वात न्यूनतम L1 घोषित होईल त्याच पात्र निविदाकारास कार्यादेश देण्यात येईल.

४.२ त्यानंतर ७ दिवसाच्या आत Work Order च्या एकूण रकमेच्या (सर्व करांसहित) रु. ३%/- इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँक ग्यारंटी रुपात जमा करावी लागेल.

४.३ सदर निविदेतील सर्व फर्निचर, साहित्य व Modular Furniture यांचा पुरवठा ९० दिवसांच्या आत करून त्या बाबतचा खरेदी समितीने काम समाधानकारक पुर्ण झाल्याचे प्रमाणित केले असेल तरच संपुर्ण पुरवठा झाला असे समजण्यात येईल व संपुर्ण देयक एकदाच एक रकमी अदा करण्यात येईल. पुरवठा ९० दिवसांच्या आत पुर्ण न झाल्यास प्रचलित शासकीय नियमांनुसार दंड आकारण्यात येईल व सदर दंड देयकातील रकमेतून वजा करून उर्वरित रक्कम पुरवठादारास अदा करण्यात येईल. तसेच

**पुरवठादाराने यापूर्वी संस्थेमध्ये दिलेली सेवा असमाधानकारक असल्यास किवा करारानुसार सेवाकाळ पूर्ण न करता सेवा मधेच खंडित केलेली असल्यास त्यांनी निविदा सादर करू नये. अशा पुरवठादरानी निविदा सादर केल्यास ती बाद ठरविण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

16-12-24

**डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे**

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय

अवसरी (खुर्द)

**Principal**
**Government College of Engineering**
**Avasari Khurd,Dist.Pune**

Govt. College of Engineering and Research, Avasari, Tal.Ambegaon, Dist.Pune सत्यमेव जयते

**प्रपत्र- अ (फर्निचर व तत्सम इतर साहित्य तांत्रिक विनिनिर्देश तपशील) (Proforma for the Technical Specifications)**

| List of furniture with detailed specifications | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of Equipment to be purchased** | **Detailed specifications** | **Balance quantity to be purchased** |
| **1** | **2** | **3** | **4** |
| 1 | Teachers Table with Drawer (5' x 3') | Teachers Table with Drawer (5' x 3'), two box table, Should have wooden or plywood top of size 5' x 3' with sunmica laminations and steel frame painted in gray color with good quality paint | **31** |
| 2 | Lab Assistant Tables with Drawer (4' x 2'6") | Lab Assistant Tables with drawer on right side and almira on left side. Should have wooden or plywood top of size 4' x 2'6" with sunmica laminations and steel frame painted in gray color with good quality paint | 12 |
| 3 | Laboratory Tables (8' x 4' Top) | Length -8' , Width -4', Height- 2.5 ', Thickness - 25 mm, Material of Legs- Nickel Chrome Plated made from MS ERW square section channel of 40 mm size and thickness 1.6 mm, Material of Table Top- plywood of ISI standard | 81 |
| 4 | Cupboards - Full Size | 2 door almiraha cupboard with four shelves and locking system. It should be steel fabricated with grey color powder coating and dimensions as L = 90 cm -95 cm, W = 45 cm-50 cm and H = 190 cm -195 cm | 40 |
| 5 | Modular HOD Cabin with Modular Cupboard, L shape table (size 7' X 2'6", 2'6"), with one side storage, Glass on Top, and CPU and Keyboard arrangement | Modular HOD Cabin with Modular Cupboard, L shape table (size 7' X 2'6", 2'6"), with one side storage, Glass on Top, and CPU and Keyboard arrangement. This item is to be finalized after site inspection by the bidder | 7 |
| 6 | Department Conference Table with 14+1 Chairs | Department Conference Table with 14+1 Chairs. This item is to be finalized after site inspection by the bidder | 6 |
| 7 | Notice board (4 x 3 size) with Push pin facility | Width - 1200 mm x Height - 900 mm, Frame material - Aluminium | 12 |
| 8 | Seminar Hall plastic Chairs with cushion | 58D x 56W x 80H cm cushion color red, frame of plastic with black color. It should have cushion and arm rest. The image is as shown. | 305 |

| | | | |
|---|---|---|---|
| |  | | |
| 9 | Faulty Chairs with High Back   | Office chair with arm rest, cushion seat back, without wheels, double pipe frame. The image shown is an indicative image. | 70 |
| 10 | Green Boards (12 x 4) | Green chalk board for classrooms having size as 12' x 4 '. Frame material: Premium Aluminium, Board material: High Abrasive HPL Surface | 10 |
| 11 | White Board (8 x 4) | width = 2400 mm, height- 1200mm, Frame-Aluminium, | 10 |
| 12 | Steel Stools  | Steel stool with round top and height of 18" and interconnected four legs. Sample image is given aside. | 220 |
| 13 | Book Rack  | Book rack with four shelves and size 30D x 84W x 168H cm. Material: powder coated steel. Opening and closure as shown in the picture. | 4 |
| 14 | Metal Bed With Matress | Metal bed with 199 X 98 X 91 cm with mattress. Bed should be welded frame without nut bolt. The welded joint must be strong. The frame shall be powder coated. | 4 |
| 15 | Shoe Rack  | 4-Tier Shoe Rack, Metal Shoe Storage Organizer, Stackable length 8' and depth of 1' 6" Shoe Shelf Freestanding Shoe Tower Space Saving for Entryway, Black | 6 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 16 | Steel Open Rack | Width - 915 mm, Height - 1830 mm, Depth - 460 mm Paint - Powder coated, Shelves Material- 0.8 mm Thick MS Sheet | 6 |
| 17 | Small Cupboard | Material: Mild Steel Minor Cupboard<br>Item Dimensions -50"X30"X17" High Precision, lockable, 3 shelves | 22 |
| 18 | Modular Furniture Tables | **10 feet running table. This item is to be finalized during site visit by the bidder before bid.** | 69 |
| 19 | Steel stools with wooden top | Steel stool with wooden top and height of 18" and interconnected four legs. Sample image is given aside. | 25 |
| 20 | Steel table without drawer (4' × 3') | Steel table without drawer (4' × 3') with wooden or plywood top laminated with high quality sunmica | 2 |
| 21 | Students Desk (बेंच)<br>Material of Desk Top- 18 mm thick prelaminated Particle Board, Mild Steel Square Section, Height of Desk Top-750mm, Width-380mm, Length -1500mm, | Material of Desk Top- 18 mm thick laminated plywood of ISI standard, Mild Steel Square Section, Height of Desk Top-750mm, Width-380mm, Length -1500mm, No nut bolt shall be visible on top | 40 |
| 22 | News paper shelf | Standard news paper shelf for library to stack 4 different news papers for 30 days in single cabinet. | 2 |
| 23 | S type Computer chairs with cushion<br> | Seat Width - 470 mm , Chair Height - 830 mm , Seat Depth - 450 mm , powder coated on MS, With Arms. Refer the image please | 10 |
| 24 | Metal book trolley with wheels<br> | Library Cart 30x14x45 Inch Rolling Book Cart Single Sided L-Shaped Flat Shelves with 4 Inch Lockable Wheels for library Book Truck in Black. Please refer the image | 4 |

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | Journal display cabinet | 5 Shelves with 20 slanted compartments, wooden material, Size 4'L x 4.5' H x 18" D | 2 |
| 26 | Book cases  | 5 Shelves with 20 compartments, wooden material, Size 4'L x 4.5' H x 18" D | 10 |
| 27 | Book issue-return counter | 40 ft running length with 2.5ft Height 2 doors (2ft width), 4 Internal cupboards for counter, surface for the Issue counter should be 2.5 ft broad. This item must be quoted after site visit by the bidder | 1 |
| 28 | Book display cabinet (Double door) | 5 Shelves with 20 slanted compartments, wooden material, Size 4'L x 4.5' H x 18" D | 2 |
| 29 | Property rack | 1) Width 6ft, 2) height 10ft, 3) Sections (In Nos.)=20, 4) Section Should be 2x1.5ft | 2 |
| 30 | Conference table with 35 chairs | Department Conference Table with 35 Chairs. This item is to be finalized after site inspection by the bidder | 1 |
| 31 | Cushion type chairs  | Seat Width - 470 mm , Chair Height - 830 mm , Seat Depth - 450 mm , powder coated on MS, With Arms. Refer the image please | 30 |
| 32 | Projector screen (7' × 5') | Manual Pull Down Wall Imported Autolock/Instalock Projector Screen, Size: - 7  x5 ft. (Highest Grade, Double Layer Fabric PASTING) | 8 |

# प्रपत्र- ब (तांत्रिक निविदा) (Proforma for the Technical Bid)

## (संस्थेच्या लेटरहेडवर)

निविदाकाराने स्वतःच्या लेटरहेडवर खालील नमुन्यात सर्व आवश्यक भरूनसही /शिक्का करून pdf format मध्ये www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करावा . त्यासोबत या निविदा सूचनेमध्ये मागणी केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या प्रति स्कॅन करून त्या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण निविदा किवा कंत्राटदाराची स्वाक्षरी नसलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. तांत्रिक निविदांमध्ये पात्र ठरणाऱ्या निविदाकारांची यादी या महाविद्यालयाच्या संकेत स्थळ www.gcoeara.ac.in येथे देखील दिनांक **०२-०१-२०२५** रोजी दुपारी **०४.३०** वाजता प्रसिद्ध करण्यात येईल . तांत्रिक निविदामधून पात्र ठरलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा दिनांक **०३-०१-२०२५** रोजी सकाळी **११.००** वाजता निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल.

**तांत्रिक निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे**

| अनु. क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | निविदाकाराच्या लेटरहेडवर निविदाकाराचा ई-मेल, दूरध्वनी क्रमांक, सही व शिक्का असलेले स्वतःचे किवा संस्थेची माहिती असलेले विवरणपत्र | होय / नाही |
| २ | PAN कार्डची प्रत | होय / नाही |
| ३ | जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत व आर्थिक वर्ष २०२२ -२३ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी रिटर्न्स सादर केल्याच्या पुरा व्याची प्रत (Form GSTR-1 व GSTR-3B) | होय / नाही |
| ४ | आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२ -२३ व २०२३-२४ चे आयकर विवरणपत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत | होय / नाही |
| ५ | वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र | होय / नाही |
| ६ | निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षांची एकूण म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ ची एकूण उलाढाल कमीतकमी **रूपये ०१ कोटी** असल्याचे संबंधीत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे आणि तसेच चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) प्रत. | होय / नाही |
| ७ | निविदेतील उल्लेखित Modular Furniture चा पुरवठा करणेसाठी प्रथम स्थळ पाहणी करून त्याबाबतचा सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचा | होय / नाही |

| | | |
|---|---|---|
| | अहवालाची प्रत. | |
| ८ | निविदाकाराकडे मागील तीन वर्षात कोणत्याही शासकीय अस्थापना येथे किमान एकूण रु. १.०० कोटी इतक्या रकमेच्या फर्निचर किंवा इतर साहित्य व उपकरणे याचा निविदा प्रक्रियेनुसार पुरवठा केलेला असला पाहिचे. त्यापृष्ट्यर्थ तसे समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा आस्थापना प्रमाणपत्र ई.) | होय / नाही |
| ९ | निविदा शुल्क रु. १९,०००/- ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची प्रत | होय / नाही |
| १० | बयाना रक्कम रु. १,९०,०००/-ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची प्रत | होय / नाही |
| ११ | निविदाकारावर कोणत्या शासकीय /निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे , निष्कासन इत्यादी ) केली नसल्याबद्दलचे स्वसाक्षांकित हमीपत्र | होय / नाही |

मी खालील सही करणारा शपथपूर्वक असे प्रमाणित करतो/ करते की वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असून त्यात कोणतीही माहिती खोटी आढळ्यास होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी हि माझी राहील . तसेच सदर कंत्राटासाठी नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

स्थळ : सही :

दिनांक : नाव :

**प्रपत्र- क (वाणिज्यिक निविदा) (Proforma for the Commercial Technical Bid)** (BoQ)

**निविदाकाराने** https://www.mahatenders.gov.in **या संकेतस्थळावरिल सदर निविदेतील वाणिज्यिक निविदे मधील** (Financial Bid ) BoQ file **मध्ये** Name of the Bidder/Bidding Firm/Company **अचूक नमूद करावी व त्याच** BoQ file **मध्ये मुद्दा क्र. २.४ नुसार दर (सर्व करांसहित ) अचूक भरावेत.**